# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या एकेचाळीसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## बुधवार, दि.२८ मार्च, २०१२ दुपारी १:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची एकेचाळीसावी सभा बुधवार, दि.२८/०३/२०१२ रोजी दुपारी १:०० वाजता** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सुर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ४) | प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | प्राचार्य श्री. पवार एस. के. | सदस्य |
| ६) | डॉ. शिळीमकर टी. एन. | सदस्य |
| ७) | डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर. | सदस्या |
| ८) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ९) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| १०) | प्राचार्य डॉ. भांजे बी. एम. | सदस्य |
| ११) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १२) | डॉ. साळुंखे डी. जे., परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १३) | डॉ. पुजारी डी. डी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १४) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी., कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

प्रा. डॉ. टी. आर. पाटील, प्राचार्य डॉ. के. एन. गणगे, डॉ. एस. एस. सुर्यवंशी, श्री. बी. आर. गायकवाड यांनी व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस अनुपस्थित राहणार असल्याचे दूरध्वनीद्वारे कळविले. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ] दि.०२ मार्च, २०१२ रोजीच्या चाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव : दि.०२ मार्च, २०१२ रोजीच्या चाळीसाव्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**१) पान क्र. ७/३४ वर, ठराव क्र. ६ मधील अ.क्र. ०१ मध्ये, "वरिष्ठ परीक्षक" ऐवजी "वरिष्ठ पर्यवेक्षक" व अ.क्र. ०२ मध्ये "कनिष्ठ परीक्षक" ऐवजी "कनिष्ठ पर्यवेक्षक" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**[ ०२ ] महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

(टिपणीः महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम २८ (भ) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर).

**ठराव : मा.कुलगुरु यांच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ] शै.वर्ष २०१२-१३ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अभ्यासक्रमातंर्गत येणारे नवीन विषय /अभ्यासक्रम / विद्याशाखा / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता सुरु करण्याबाबत प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्रं एनजीसी २०१०/(१९३/ १०) मशि ४ दि. ३०/१०/२०१० व एनजीसी २०११/(२४०/११) मशि ४ दि.२५/१०/२०११ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः शै.वर्ष २०१२-१३ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अभ्यासक्रमातंर्गत येणा-या नवीन विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३ / १०) मशि ४ दि. ३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११ / (२४० / ११) मशि ४ दि.२५/१०/२०११ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै.वर्ष २०१२-१३ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून ए.आय.सी.टी.ई अभ्यासक्रमातंर्गत येणा-या नवीन विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरु महोदय यांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.१७/०३/२०१२ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेसमारे विषय क्रं ५ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आले असता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्रं ५ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१२-१३ पासून ए.आय.सी.टी.ई अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नवीन विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर मा.कुलगुरु महोदय यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव)

**ठरावः मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ]** **शै.वर्ष २०१२-१३ पासून नोंदणीकृत संस्थेकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून नवीन पारंपारिक महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त प्रस्तावावर शासन निर्णय क्रं एनजीसी २०१० / (१९३/१०) मशि-४ दि.३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११/(२४०/११) मशि-४ दि.२५/१०/२०११ नुसार केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: शै.वर्ष २०१२-१३ पासून विद्यापीठाकडे सोबत जोडलेल्या यादी प्रमाणे नोंदणीकृत संस्थाकडून / संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

सदर प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र शासन निर्णय क्रं एनजीसी २०१०/(१९३/१०)मशि-४ दि.३०/१०/२०१० व शासन निर्णय क्रं एनजीसी २०११/(२४०/११)मशि-४ दि.२५/१०/२०११ नुसार कार्यवाही पूर्ण केलेली आहे.

उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन शै.वर्ष २०१२-१३ पासून संलग्नित महाविद्यालयांकडून पारंपारिक अभ्यासक्रमातंर्गत येणा-या नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमता / विद्याशाखा सुरु करण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावावर मा.कुलगुरु महोदय यांनी सोबत जोडल्या प्रमाणे केलेली कार्यवाही दि.१७/०३/२०१२ रोजीच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या सभेसमारे विषय क्रं ४ अन्वये माहितीस्तव सादर करण्यात आले असता महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्रं ४ अन्वये उपरोक्त शासन निर्णयानुसार मा.कुलगुरु महोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेतलेली आहे.

सबब शै.वर्ष २०१२-१३ पासून पारंपारिक अभ्यासक्रमातंर्गत येणाऱ्या नवीन महाविद्यालय / विषय / अभ्यासक्रम / अतिरीक्त तुकडी / विद्याशाखा सुरु करण्यासाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर मा.कुलगुरु महोदय यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव)

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ]  भांडारपाल या पदाकरीता शैक्षणिक अर्हता निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**

**(टिपणी:** सोलापूर विद्यापीठाकडील भांडारपाल या पदासाठी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.
१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विज्ञान/वाणिज्य शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.
२) शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.
३) संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
सदर पद भरण्याकरीता जाहिरात क्र. सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८-०३-२०१० रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार १२ अर्ज प्राप्त झाले होते परंतू विहित करण्यात आलेल्या पात्रतेनुसार एकही अर्ज पात्र ठरला नाही. तदनंतर जाहिरात क्र. सोविसो/आस्था/५७/२०११-१२ दि.०२-०१-२०१२ व दि.०६/०२/२०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर जाहिरातीस अनुसरुन ०३ अर्ज प्राप्त झाले. तथापि यावेळेसही एकही अर्ज पात्र ठरला नाही.

सदर विहित करण्यात आलेल्या पात्रतेनुसार एकही अर्ज पात्र न ठरल्याने महाराष्ट्रातील इतर अकृषि विद्यापीठकडून भांडारपाल या पदाकरीता असलेल्या शैक्षणिक अर्हता मागविण्यात आली असता ती खालीलप्रमाणे आहे.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

1) Graduate of Commerce faculty of any statutory University.
2) Three years working experience in the relevant field.
3) Candidate should not be less than 18 years of age and not more than 33 years of age.
4) Candidate should posses a "Certificate of D.O.E.A.C. Societies "C.C.C." of "A" level of "B" level of "C" level or MS-CIT of GECT Certificate of Maharashtra State HIGHER & Technical Education Board" OR a Certificate in Computer Operation prescribed by the Govt. of Maharashtra from time to time.

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

१) वाणिज्य शाखेचा पदवीधर किंवा अभियांत्रिकी पदवी वा पदविका.
२) स्टोअर अकौंटींग आणि स्टोअर मॅनेजमेन्ट कामाचा विद्यापीठ/औद्योगिक किंवा व्यावसायिक संस्था/बॅक/शासकीय/महामंडळ यातील ७ वर्षाचा अनुभव. परंतू अभियांत्रिकी पदवी धारकांसाठी हा अनुभव ४ वर्षापर्यंत शिथिलक्षम.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम २८ (टी) नुसार भांडारपाल या पदाची शैक्षणिक अर्हता ठरविण्याची बाब विचारार्थ)

ठराव : **भांडारपाल या पदाकरीता खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक.**
**२) संबंधित कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.**
**३) संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.**

**[ ०६ ] सांख्यिकी सहायक या पदाकरीता शैक्षणिक अर्हता निश्चित करण्याची बाब विचारार्थ.**

**(टिपणी:** सोलापूर विद्यापीठाकडील सांख्यिकी सहायक या पदासाठी शैक्षणिक अर्हता खालीलप्रमाणे आहे.

१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची एम. एस्सी / एम. कॉम (सांख्यिकी) पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.

२) शासकीय अथवा निमशासकीय कार्यालयातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक.

३) संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

सदर पद भरण्याकरीता जाहिरात क्र. सोविसो/आस्था/३२/२०१० दि.०८-०३-२०१० रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार १० अर्ज प्राप्त झाले होते परंतू विहित करण्यात आलेल्या पात्रतेनुसार एकही अर्ज पात्र ठरला नाही. तदनंतर जाहिरात क्र. सोविसो/आस्था/५७/२०११-१२ दि.०२-०१-२०१२ व दि.०६-०२-२०१२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली. सदर जाहिरातीस अनुसरुन ११ अर्ज प्राप्त झाले. तथापि यावेळेसही एकही अर्ज पात्र ठरला नाही.

सदर विहित करण्यात आलेल्या पात्रतेनसुार एकही अर्ज पात्र न ठरल्याने महाराष्ट्रातील इतर अकृषि विद्यापीठकडून सांख्यिकी सहायक या पदाकरीता असलेल्या शैक्षणिक अर्हता मागविण्यात आली असता ती खालीलप्रमाणे आहे.

**पुणे विद्यापीठ**

1) Graduate in any faculty with Diploma in Computer Management / Applications.
**Desirable**:P. G. with Statistics.
**Experience** : 3 years experience as a Relevent Field.

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

1) Graduate of Science faculty with Statistics of any statutory University
2) Three years working experience in the relevant field.
3) Candidate Should not be less than 18 years of age and not more than 33 years of age.
4) Candidate should posses a "Certificate of D.O.E.A.C. Societies "C.C.C." of "A" level of "B" level of "C" level or MS-CIT of GECT Certificate of Maharashtra State HIGHER & Technical Education Board" OR a Certificate in Computer Operation prescribed by the Govt. of Maharashtra from time to time.

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

अ) पदवी /पदव्युत्तर पदवी सांख्यिकी विषयासह.
ब) इंग्रजी व मराठी टंकलेखन आवश्यक.
क) विद्यापीठ/महाविद्यालये/बँक/महामंडळ यातील तत्सम कामाचा ३ वर्षाचा अनुभव.

सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम २८ (टी) नुसार सांख्यिकी सहायक या पदाची शैक्षणिक अर्हता ठरविण्याची बाब विचारार्थ)

**ठराव : सांख्यिकी सहायक या पदाकरीता खलीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता निश्चित करण्यास मान्यता देण्यात आली.**

**१) मान्यता प्राप्त विद्यापीठाची सांख्यिकी विषयासह पदवी / पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक.**

**२) संबंधित कामाचा ३ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.**

**३) संगणक ज्ञानासाठी DOEACC संस्थेच्या C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण किंवा महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची MS-CIT संगणक परीक्षा नियुक्ती दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.**

**[ ०७ ] विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

**(टिपणी:** विद्यापीठातील पदोन्नतीच्या वाटयातील रिक्त पदावर प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पात्र / अपात्र ठरविण्यासाठी नेमलेली समिती खालीलप्रमाणे.

१) प्रा. डॉ. एस. व्ही. लोणीकर, सदस्य, व्यवस्थापन परिषद

२) प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे, सदस्य, व्यवस्थापन परिषद

३) डॉ. आर. बी. भोसले, सदस्य, मागासवर्गीय प्रतिनिधी व सचिव, विशेष कक्ष स्थायी समिती.

उपरोक्तप्रमाणे, नेमलेल्या समितीने दि. २२/०२/२०१२ रोजी प्रशासकीय कर्मयाऱ्यांची पदोन्नतीसाठी शिफारस केलेली आहे.

या समितीच्या शिफारशीनुसार पात्र कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ)

**ठराव : विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवाल खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली. समितीच्या अहवालातील पान क्र. ५ वर,**

**१) वर्ग - ३ कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीच्या तक्त्यामध्ये रकाना ३ मध्ये अ.क्र. १ मध्ये "कनिष्ठ लिपिक अनुसूचित जाती" ऐवजी "कनिष्ठ लिपिक अनुसूचित जमाती" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**२) वर्ग - ३ कनिष्ठ लिपिक पदावर पदोन्नतीच्या तक्त्यामध्ये रकाना ३ मध्ये अ.क्र. २ मध्ये "मा. जिल्हा शल्य चिकित्सक सोलापूर यांचा अभिप्राय घेवुन पुढील कार्यवाही करण्याची" हे शब्द वगळण्यात यावेत.**

**[ ०८ ] दि.१६/०३/२०१२ रोजीच्या तक्रार निवारण समितीने केलेल्या शिफारशी विचारार्थ.**

(टिपणीः तक्रार निवारण समितीकडे प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जावर दि.१६/०३/२०१२ रोजी तक्रार निवारण समितीच्या बैठकीत सुनावणी घेण्यात आली. दि.१६/०३/२०१२ रोजीच्या बैठकीत सुनावणी झालेल्या तक्रारी अर्जासंदर्भातील तक्रार निवारण समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेल्या शिफारशी सोबत जोडल्या आहेत.

सदरच्या शिफारशींना परिनियम ३३५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. सोबत जोडल्या प्रमाणे तक्रार निवारण समितीच्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठरावः दि.१६/०३/२०१२ रोजीच्या तक्रार निवारण समितीने केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**१) पान क. ५ वर, ठराव क्र. २ मध्ये, ३) यामध्ये "सन २०११" ऐवजी "सन २००१" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**२) पान क्र. ८ वर, ठराव क्र. ३ मध्ये, ३) यामध्ये "सन २०११" ऐवजी "सन २००१" अशी दुरुस्ती करण्यात यावी.**

**[ ०९ ]  विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविण्यास देण्याबाबत.**

(टिपणीः विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविण्यासाठी दै. पुण्यानगरीमध्ये दि.२४/१२/२०११ रोजीच्या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यास अनुसरुन निविदा विद्यापीठ कार्यालयात पोहोच करण्याची अंतिम तारीख दि.१२/०१/२०१२ होती. त्यानुसार सदर मुदतीत एकूण पाच निविदा प्राप्त झाल्या. तद्नंतर निविदा धारक व खरेदी समिती सदस्यांसमोर सदर कामाची तांत्रिक निविदा उघडण्यात आल्या असता प्राप्त पाच निविदा तांत्रिक निविदेत पात्र झाल्याने त्यांचे आर्थिक निविदा उघडण्यात आल्या. प्राप्त झालेल्या निविदाधारकांनी आर्थिक निविदेच्या नमूद केलेल्या दरामध्ये तफावत असल्याने वाटाघाटी न करता पदार्थाचा दर्जा तपासणी करण्यासाठी तीन सदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती.

उपाहारगृह चालविणे कामासाठी पदार्थाचा दर्जा तपासणी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून तो सोबत अवलोकनार्थ जोडला आहे. सबब तीन सदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार व सोबत जोडलेल्या तक्त्यातील दरानुसार सदरचे उपाहारगृह मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना चालविण्यास देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :  विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह चालविण्यास देण्याबाबत पदार्थाचा दर्जा तपासणी समितीने केलेल्या शिफारशी व तुलनात्मक तक्ता याचा विचार करता विद्यापीठ परिसरातील उपाहारगृह मे. हॉटेल शिवनेरी ॲन्ड मेस, सोलापूर यांना तुलनात्मक तक्त्यातील दरानुसार एक वर्षासाठी चालविण्यास देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आलेल्या NMEICT Project करीता विद्यापीठ परिसरात LAN करण्यासाठी येणाऱ्या एकूण खर्चापैकी विद्यापीठाच्या हिश्याच्या रु.९,९४,९३५.६६/- या खर्चास मान्यतेची बाब विचारार्थ.**

(टिपणी: BSNL NMEICT Project चा प्रस्ताव Ministry of HRD कडून पुरस्कृत झाला असून सदर प्रणाली घेण्यासाठी होणाऱ्या खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Total Cost / University | BSNL Share (Discount) | Ministry Share | Universities Share |
|---|---|---|---|---|
| 1 | Rs.2 Crore | Rs.20 Lakhs | Rs.1.35 Crores | Rs.45 Lakhs |

विद्यापीठ कार्यालयाकडून BSNL च्या प्रस्तावावर प्रा. पी. बी. जोशी यांच्याकडून तांत्रिक अभिप्राय मागविण्यात आला होता. NMEICT ही प्रणाली विद्यापीठात लागू करण्यास व्यवस्थापन परिषदेच्या दि.१७ मार्च २०११ रोजी विषय क्र. १६ अन्वये विषय सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

**ठराव : बीएसएनल एनएमइआयसीटी कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यासाठीच्या प्रस्तावावरील डॉ. पी. बी. जोशी यांनी दिलेल्या तांत्रिक अभिप्राय विचारात घेवून बीएसएनएल एनएमइआयसीटी कार्यप्रणाली विद्यापीठात कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली.**

उपरोक्त ठरावानुसार BSNL यांनी दि.३१/०३/२०११ रोजी विद्यापीठात NMEICT ही प्रणाली कार्यान्वित केली आहे. विद्यापीठास या प्रणालीकरीता एकूण रु.४९,६३,५००/- सर्व करासहीत BSNL यांना आदा करावे लागणार आहे. यापैकी टोकन अमाऊंट म्हणून रु.९९,२७०/- (रु.४९,६३,५००/- च्या २% रक्कम) विद्यापीठाने BSNL कडे जमा केली आहे. BSNL यांनी सप्टेंबर २०११ मध्ये विद्यापीठात Lease Line कार्यान्वित केली आहे.

विद्यापीठाकडील सर्व संकूल व विभागांना या Lease Line मधून कनेक्शन देण्याकरीता लागणाऱ्या केबलसाठी येणाऱ्या खर्चासंदर्भात मे. साई इन्फोटेक सर्व्हिसेस यांच्याकडून सर्व्हे करुन तपासणी अहवाल मागविण्यात आला होता. या अहवालावर अभिप्राय घेण्याकरीता प्रा. आर. एस. मेंते व प्रा. ए. आर. शिंदे यांची समिती गठीत करण्यात आली होती. या समितीने सदर तपासणी अहवालाचा अभ्यास करुन साई इन्फोटेक सर्व्हिसेस यांच्या प्रस्तावानुसार खालीलप्रमाणे शिफारशी केल्या आहेत.

१) सर्व्हे रिपोर्टमधील पान क्र. १० वर दिल्याप्रमाणे विद्यापीठाच्या परिसरातील विविध इमारतीत अंतर्गत नेटवर्कसाठी दिलेल्या संगणकाची संख्या योग्य आहे असे वाटते.

२) Library च्या इमारतीतील व संगणकशास्त्र संकुलातील एकूण सात L२ Switches बदलून घेणे गरजेचे आहे. यासाठी विद्यापीठाला अधिकची रक्कम आदा करावी लागणार नाही.

३) पान क्र. १३ वर विविध इमारतीमध्ये Library इमारतीपासून Internet चे Connection देण्यासाठी दिलेला नकाशा योग्य वाटतो. या नकाशाप्रमाणे Fiber Cable चे कनेक्शन देण्यात येईल.

४) पान क्र. १७ ते २२ वर विविध इमारतीमध्ये लागणाऱ्या मटेरिअलची संख्या दिली आहे. ती इमारतीतील संगणकाच्या संख्येनुसार योग्य आहे, असे वाटते.

५) पान क्र. २८ व २९ वर अनुक्रमे सुरुवातीचे दोन वर्षाची व तिसऱ्या वर्षापासून पुढे होणाऱ्या खर्चाचा तपशील दिला आहे.

| कालावधी | MHRD (७५%) | विद्यापीठ (२५%) |
|---|---|---|
| सुरवातीचे २ वर्षे | २९,८४,८०५.३८ | ९,९४,९३५.३३ |
| तिसऱ्या वर्षापासून पुढे प्रत्येक वर्षी | ४,८५,७६७.१५ | १,६१,९२२.३८ |
| एकूण | ३४,७०,५७३.१३ | ११,५६,८५७.७१ |

एकूण खर्चापैकी ७५% खर्च MHRD यांच्याकडून करण्यात येणार असून उर्वरित २५% खर्च विद्यापीठास करावा लागणार आहे. सुरवातीला २ वर्षाकरिता विद्यापीठास रु.९,९४,९३५.३३/- इतकी रक्कम BSNL यांना आदा करावी लागणार आहे व दोन वर्षानंतर पुढील प्रत्येक वर्षी रु.१,६१,९२२.३८/- इतकी रक्कम BSNL यांना आदा करावी लागणार आहे.

सबब रु.९,९४,९३५.३३/- इतकी रक्कम BSNL यांना NMEICT प्रोजेक्ट अंतर्गत केबलिंग खर्चापोटी देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **विद्यापीठात कार्यान्वित करण्यात आलेल्या NMEICT Project करीता विद्यापीठ परिसरात LAN करण्यासाठी येणाऱ्या एकूण खर्चापैकी विद्यापीठाच्या हिश्याच्या रु.९,९४,९३५.६६/- या खर्चास मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **सचिव** | **अध्यक्ष** |
| **व्यवस्थापन परिषद** | **व्यवस्थापन परिषद** |